महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

मासं/रवका/न.क्र.२४-२५
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmhrmsedcl@gmail.com
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्र. ०२२ - ६९४२५१४१

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ७०२ दिनांक ०९ / १२ /२०२५

**विषय:** महावितरण कंपनीतील एसएलडीसी, कळवा येथे कार्यरत अधिकारी यांना देय असलेल्या विशेष भार प्रेषण भत्त्याच्या (Special Load Dispatch Allowance) दरामध्ये वाढ करणेबाबत.

**संदर्भ:** १. प्रशासकीय परिपत्रक क्र.५४९ दि.२३.११.२०१६.
२. प्रशासकीय परिपत्रक क्र.६१३ दि.१५.१२.२०२०.

*****

वीज क्षेत्रातील बदलत्या परिस्थितीमध्ये एसएलडीसी, कळवा (SLDC, Kalwa) येथे कार्यरत सर्व कर्मचाऱ्यांची महत्वाची भूमिका आणि त्यांचेवरील भार नियोजनाची जबाबदारी विचारात घेऊन कर्मचाऱ्यांचे मनोबल वाढविण्याच्या उद्देशाने विशेष भार प्रेषण भत्ता (Special Load Dispatch Allowance) संदर्भ क्र.१ नुसार लागू करण्यात आला आहे. तसेच सदर भत्त्याचे दर संदर्भ क्र.२ अन्वये यापूर्वी सुधारीत करण्यात आलेले आहेत.

२. एसएलडीसी, कळवा येथे कार्यरत कर्मचाऱ्यांकरिता देय असलेला विशेष भार प्रेषण भत्त्याचे (Special Load Dispatch Allowance) पुनर्विलोकन करुन सदर भत्त्यात वाढ करण्याचा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता.

३. या अनुषंगाने, एसएलडीसी, कळवा येथे विविध पदांवर कार्यरत अधिकाऱ्यांकरिता लागू असलेल्या विशेष भार प्रेषण भत्त्याच्या (Special Load Dispatch Allowance) प्रचलित दरामध्ये सक्षम अधिकारी यांनी २५% वाढ करण्यास मंजुरी प्रदान केलेली आहे. सदरचे सुधारित दर खालीलप्रमाणे राहतील.

| अ.क्र. | पद | सध्या प्रचलित दर (प्रति माह रु.) (प्र.प.क्र.६१३ दि.१५.१२.२०२०) | सुधारित दर (प्रति माह रु.) |
|---|---|---|---|
| १ | अधीक्षक अभियंता | ५३८१ | **६७३०** |
| २ | कार्यकारी अभियंता | ४७५८ | **५९५०** |
| ३ | अतिरिक्त कार्यकारी अभियंता | ४००७ | **५०१०** |
| ४ | उप कार्यकारी अभियंता | ३६०२ | **४५००** |
| ५ | सहाय्यक अभियंता | २८६७ | **३५८०** |

४. सदर विशेष भार प्रेषण भत्ता (Special Load Dispatch Allowance) हा दरमहा वेतनासोबत अदा करण्यात यावा, तथापि इतर लाभांकरीता हा भत्ता गणण्यात येउ नये. सदरचा भत्ता संबंधित अभियंता एसएलडीसी, कळवा येथे कार्यरत असेपर्यंतच लागू राहील व अशा अभियंत्यांची बदली एसएलडीसी, कळवा येथून इतरत्र कार्यालयात झाल्यास हा भत्ता बंद करण्यात येईल.

५. उपरोक्त तक्त्यात नमूद केलेले सुधारित दर हे दि.०१.१२.२०२५ पासून अंमलात येतील.

६. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**(भूषण कुलकर्णी)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (वित्त)/(संचलन)/(मासं)/(प्रकल्प)/(वाणिज्य) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर/कल्याण.
३) कार्यकारी संचालक (वित्त व लेखा)/(वितरण)/(पायाभूत आराखडा)/(विशेष प्रकल्प)/(मासं)/(सुवअं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
४) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/(सांघिक वित्त)/(अंतर्गत लेखा परिक्षण/(सांघिक लेखा)/(माहिती तंत्रज्ञान)/ मुख्य विधी सल्लागार/मुख्य तपास अधिकारी/ कंपनी सचिव, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.

३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.

४) सर्व मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई. (सांघिक कार्यालय/क्षेत्रीय कार्यालय)

**प्रत रवाना:**

१) महाव्यवस्थापक (मासं)/(मासं-मासंव्यप्र)/(नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.